(623) (55)

क्रं.द.व सु./परिपत्रक/०९६१३
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
हॉंगकॉंग बँक बिल्डींग, ३ रा मजला,
महात्मा गांधी मार्ग, फोर्ट,
मुंबई : ४०० ००१.

दिनांक : २३ ऑगस्ट-१९८३.

<u>प रि प त्र क</u>

संदर्भ : (१) सर्क्यूलर नंबर जीइरन/११२/५११६,
दि. २३ डिसेंबर १९६८.
(२) मेमो नंबर व्हीएस/१८/सर्क्यूलर/मेमो/३२६,
दिनांक ११ जानेवारी १९७७.
(३) सर्क्यूलर नंबर जीइडो/व्ही/एचओ/६०४
दिनांक २५ फेब्रुवारी १९८३.

.....

वरील परिपत्रकांद्वारे आदेश दिलेले असूनही, मिळालेल्या तक्रारीच्या/माहिती इत्यादीच्या आधारे दक्षता अधिकारी तपास करण्याचे कार्य करत असतांना, माहिती देण्याअगोदर तक्रारीची प्रत मिळणे, चौकशीमागचा हेतू कळणे, ज्यांची चौकशी करावयाची त्यांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांची चौकशीसाठी पूर्व परवानगी घेणे, चौकशी करणारी व्यक्ती ज्याची चौकशी करावयाची त्या व्यक्तीपेक्षा निम्न दर्जाची असणे किंवा तांत्रिक बाबतीत चौकशी करणारी व्यक्ती स्वत: अतांत्रिक संवर्गातील असणे इत्यादी बाबतीतील अटींची पूर्तता केल्याशिवाय कांही कर्मचाऱ्यांनी माहिती देण्याचे नाकारले असल्याचे संचालक, दक्षता व सुरक्षा यांनी कळविले आहे.

२. या बाबतीत असे स्पष्ट करण्यात येते की दक्षता व सुरक्षा अधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि कार्ये यापूर्वी वेळोवेळी प्रसृत केलेल्या परिपत्रकान्वये विनिर्दीष्ठत करण्यात आली आहेत. तसेच, असेही कळविण्यात येते की दक्षता व सुरक्षा कर्मचारीवर्ग हा मंडळाचा भाग असून त्यांना उचित अधिकार प्रदान करून चौकशीसाठी विनिर्दीष्ठत जबाबदारी सोपविण्यात आली आहे (ते दक्षता व सुरक्षा विभागातील कोणत्याही हुद्याचे अधिकारी असोत). दक्षता/सुरक्षा अधिकारी कायदेशीर कर्तव्य करतांना त्याने विचारलेल्या प्रश्नास संबंधीत कर्मचाऱ्याने त्यास असलेली माहिती दक्षता अधिकाऱ्याच्या इच्छेनुसार तोंडी वा लेखी स्वरुपात देण्यास नाखुशी प्रकट केली अथवा ती देण्यास टाळाटाळ केली किंवा ती दिली नाही तर ते शिस्तभंगाचे वर्तन मानण्यात येऊन त्याच्यावर त्याअनुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल.

३. संदर्भित परिपत्रकांतील आदेश सर्व कर्मचाऱ्यांस लागू असून असे निर्देश देण्यात येत आहेत की दक्षता चौकशी ही प्राथमिक स्वरूपाची असून संबंधित कर्मचाऱ्यांनी स्वत:च्या कोणत्याही अटी न मांडता सहकार्य करावे. मंडळाच्या सेवा विनियमा-नुसार पद्धतशीर विभागीय चौकशी सुरु करावी की नाही याचा निर्णय सक्षम

अधिकारी, उपरोल्लिखित चौकशीच्या निष्कर्षाच्या आधारे [illegible] ठरविणार असून चौकशी झाल्यास त्यावेळी कर्मचा-यास स्वत:चा बचाव करण्याचे संपूर्ण हक्क असतील.

४. वरील बाबींचा विचार करता मंडळाच्या हितास्तव दक्षता तपास करण्यासाठी मंडळाने नेमलेल्या दक्षता अधिका-यांच्या प्रश्नांना तोंडी अथवा लेखी उत्तरे देणे हे कर्मचा-यांना बंधनकारक आहे. परिपत्रकातील सूचनांचा भंग केल्यास अथवा तपासकामी सहकार्य करण्यास टाळाटाळ अथवा विलंब केल्यास संबंधित कर्मचा-यांच्या बाबतीत गंभीरपणे विचार करण्यात येऊन, त्यांच्यावर आधीच करण्यात आलेल्या आरोपांबाबत करावयाच्या कार्यवाहीव्यतिरिक्त, चौकशी करणा-या कर्मचारीवर्गाशी गैरवर्तन केल्याबद्दलही शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल.

(पु. अब्राहम)
अध्यक्ष

प्रेषण पद्धतीप्रमाणे सर्वांना.

DATE 25/8
SIGN

मंविको•२२•८•८९•